# राज्यातील हवामान, खरीप हंगाम २०१९ पिक पेरणी व पिक परिस्थितीचा दिनांक ०६ /०९/२०१९ अखेरचा साप्ताहिक अहवाल

**हवामान व पर्जन्यमान** - राज्यात अहवाल कालावधीत बहुतांश विभागात आकाश ढगाळ होते. राज्यात बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली. कोकण व नागपूर विभागात काही ठिकाणी जोरदार ते अतिजोरदार तर नाशिक, पुणे, कोल्हापूर व लातूर विभागात तुरळक ठिकाणी जोरदार स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.

राज्यात दि.१ जून ते ०६ सप्टेंबर, २०१९ कालावधीचा सरासरी पाऊस ९६९.६ मि.मी.असून दि.०६ सप्टेंबर, २०१९ पर्यंत ९८८.९ मि.मी.म्हणजेच सरासरीच्या १०२.० टक्के पाऊस झाला.

राज्यात दि. १ जून ते ०६ सप्टेंबर, २०१९ अखेरीस सरासरीच्या तूलनेत प्रत्यक्ष पडलेल्या पावसानुसार जिल्ह्याची वर्गवारी खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | पर्जन्यमान टक्केवारी | जिल्हे संख्या | जिल्ह्यांची नावे |
|---|---|---|---|
| १ | ० ते २५ % | ० | -- |
| २ | २५ ते ५० % | ० | -- |
| ३ | ५० ते ७५ % | ०५ | सोलापूर, बीड, लातूर, उस्मानाबाद, परभणी |
| ४ | ७५ ते १०० % | १३ | औरंगाबाद, जालना, नांदेड, हिंगोली बुलढाणा, अकोला, वाशिम, अमरावती, यवतमाळ, वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदिया. |
| ५ | १०० % पेक्षा जास्त | १६ | ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पालघर, नाशिक धुळे, नंदुरबार,जळगांव, अहमदनगर, पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, चंद्रपूर, गडचिरोली. |

राज्यात दि.०६ सप्टेंबर, २०१९ अखेर पर्जन्यमान सरासरीच्या तूलनेत एकूण ३५५ तालूक्यांपैकी २ तालूक्यांत २५ ते ५० %, ५६ तालूक्यात ५० ते ७५ %, ११८ तालूक्यात ७५ ते १००% तर १७९ तालूक्यात १००% पेक्षा जास्त पाऊस झाला आहे.

## खरीप हंगाम २०१९ पिक पेरणी व पिक परिस्थिती -

राज्यात खरीप पिकांचे सरासरी क्षेत्र (ऊस वगळून) १४०.६९ लाख हेक्टर असून दि. ०६ सप्टेंबर, २०१९ अखेर १३८.२८ लाख हेक्टर क्षेत्रावर (९८%) पेरणी झाली आहे. तसेच राज्यात खरीप पिकांचे ऊस पिकासह सरासरी क्षेत्र १४९.७४ लाख हेक्टर असून १३९.४३ लाख हेक्टर क्षेत्रावर (९३%) पेरणी/लागवड झाली आहे.



राज्यात भात व बाजरी पिके फुटवे फुटण्याच्या तर काही ठिकाणी पोटरीच्या अवस्थेत; मूग,उडिद पिके शेंगा धरणे तर काही ठिकाणी शेंगा पक्वतेच्या अवस्थेत; सोयाबीन पिक फुलोरा तर काही ठिकाणी शेंगा लागणेच्या अवस्थेत; कापूस पिक वाढीच्या तर काही ठिकाणी पाते, फुले लागण्याच्या अवस्थेत; मका पिक वाढीच्या ते फुलोरा अवस्थेत; भुईमूग पिक फुलोरा ते आऱ्या सुटणेच्या अवस्थेत असून ज्वारी व तूर पिके वाढीच्या अवस्थेत आहेत. पिकांमध्ये आंतर मशागतीची कामे सुरु आहेत.

**किड व रोग** - राज्यात काही ठिकाणी मका व ज्वारी पिकावर लष्करी अळीचा, कापूस पिकावर गुलाबी बोंड अळी व रस शोषणाऱ्या किडींचा, सोयाबीन पिकावर पाने खाणारी अळी, अमेरिकन बोंड अळी, खोडमाशी, गर्डल बीटल व ऊंट अळीचा; भात पिकावर पिवळया खोडिकडीचा, ऊस पिकावर हुमणी व अमेरिकन लष्करी अळीचा तर भुईमूग पिकावर मावा व फुलकीडींचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. कृषि विभागामार्फत किड व रोग नियंत्रणासाठी प्रचार व प्रसिध्दीची कार्यवाही सुरु आहे.

दिनांक ०६ सप्टेंबर, २०१९ अखेरील, माहे जुलै व ऑगस्ट २०१९ मधील अतिवृष्टी/पूरस्थितीमुळे बाधित झालेल्या क्षेत्राबाबतच्या नजर अंदाजित प्राथमिक अहवालानुसार राज्यात ४१७५१६ लाख हेक्टर तर दि.०५ सप्टेंबर अखेर ८९४३.८० लाख हेक्टर असे मिळून एकूण ४२६४५९.८० लाख हे.क्षेत्र अतिवृष्टी/पूरस्थितीमुळे बाधित झाले आहे. बाधित पिकांमध्ये प्रामुख्याने ऊस, भुईमूग, कापूस, ख.ज्वारी, मका, भात, सोयाबीन, तूर, मूग, उडिद, बाजरी, नागली,वरई,भाजीपाला इ. पिकांचा समावेश आहे.

**विभागीय पिक परिस्थिती-**

**कोकण विभाग-**

**हवामान**-अहवाल कालावधीत विभागात आकाश ढगाळ होते. विभागात मध्यम ते जोरदार स्वरुपाच्या तर काही ठिकाणी जोरदार ते अतिजोरदार स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली आहे.

विभागात दि.०६ सप्टेंबर, २०१९ अखेर पर्जन्यमान सरासरीच्या तूलनेत एकूण ४७ तालूक्यांपैकी २ तालूक्यात ७५ ते १०० % तर ४५ तालूक्यात १०० % पेक्षा जास्त पाऊस झाला आहे.

**खरीप हंगाम २०१९** - विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र ४.६१ लाख हेक्टर असून दि. ०६ सप्टेंबर, २०१९ अखेर ४.०२ लाख हेक्टर क्षेत्रावर (८७%) पेरणी झाली आहे. विभागात भात व नाचणी पिकांच्या पुर्नलागवडीची कामे पुर्ण् झाली आहेत. भात पिकाची रोपे पिक फुटवे फुटणे तर काही ठिकाणी पोटरीच्या अवस्थेत आहे. नाचणी पिक फुटवे फुटणेच्या अवस्थेत असून, कडधान्य पिके वाढ ते फुलोरा अवस्थेत आहेत.

**किड व रोग-** विभागात काही ठिकाणी भात पिकावर पिवळी खोडकिड या किडींचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. विभागात अतिवृष्टीमुळे भात, नागली, वरई व भाजीपाला पिके बाधित झाली आहेत.

**नाशिक विभाग-**

**हवामान-** अहवाल कालावधीत विभागात आकाश ढगाळ होते. विभागात हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या तर तुरळक ठिकाणी जोरदार स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली आहे.

विभागात दि.०६ सप्टेंबर, २०१९ अखेर पर्जन्यमान सरासरीच्या तूलनेत एकूण ४० तालूक्यांपैकी १ तालूक्यात ५० ते ७५ %, ४ तालूक्यात ७५ ते १००% तर ३५ तालूक्यात १०० % पेक्षा जास्त पाऊस झाला आहे.

**खरीप हंगाम २०१९** – विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र २१.३१ लाख हेक्टर असून दि. ०६ सप्टेंबर, २०१९ अखेर २०.२७ लाख हेक्टर क्षेत्रावर (९५%) पेरणी झाली आहे. विभागात बाजरी पिक वाढ, फुटवे फुटणे ते फुलोरा अवस्थेत, मूग व उडिद पिके पक्वतेच्या अवस्थेत, कापूस पिक वाढ तर काही ठिकाणी पाते व फुले लागण्याच्या अवस्थेत आहे. भूईमुग व भात पिके वाढीच्या अवस्थेत आहेत. पिकांमध्ये आंतरमशागतीची कामे सुरु आहेत.

**किड व रोग-** विभागात काही ठिकाणी मका पिकावर लष्करी अळीचा, कापूस पिकावर गुलाबी बोंड अळी व रस शोषणाऱ्या किडींचा, भात पिकावर पिवळया खोडकिडीचा प्रादुर्भाव दिसून येत आहे.

**पुणे विभाग-**

**हवामान-** अहवाल कालावधीत विभागात आकाश ढगाळ होते. विभागात हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या तर तुरळक ठिकाणी जोरदार स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली आहे.

विभागात दि.०६ सप्टेंबर, २०१९ अखेर पर्जन्यमान सरासरीच्या तूलनेत एकूण ३९ तालूक्यांपैकी १ तालूक्यात २५ ते ५० %,१० तालूक्यात ५० ते ७५ %, १० तालूक्यात ७५ ते १००% तर १८ तालूक्यात १०० % पेक्षा जास्त पाऊस झाला आहे.

**खरीप हंगाम २०१९ -** विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र ७.११ लाख हेक्टर असून दि.०६ सप्टेंबर, २०१९ अखेर १०.०७ लाख हेक्टर क्षेत्रावर (१४२%) पेरणी झाली आहे. विभागात भात पिक फुटवे फुटण्याच्या अवस्थेत, मका पिक वाढ तर काही ठिकाणी फुलोऱ्याच्या अवस्थेत आहे. बाजरी पिक वाढ, फुटवे फुटणे, पोटरी ते दाणे भरण्याच्या अवस्थेत, मूग व उडीद पिके शेंगा भरणे ते शेंगा पक्वतेच्या अवस्थेत, सोयाबिन पिक फुलोरा ते शेंगा लागण्याच्या अवस्थेत आहे. तूर पिक वाढ ते फांद्या फुटणेच्या अवस्थेत आहे. पिकांमध्ये आंतरमशागतीची कामे सुरु आहेत. काही ठिकाणी अपुरा पाऊस व पावसातील खंडामुळे पिकांच्या वाढीवर परिणाम होत आहे.

**किड व रोग-** विभागात काही ठिकाणी मका पिकावर लष्करी अळीचा, भुईमूग पिकावर मावा व फुलकीडीचा सोयाबीन पिकावर उंट अळी, खोडमाशी, गर्डल बीटल, पाने खाणारी अळी व अमेरिकन बोंड अळीचा, तूर पिकावर पाने खाणाऱ्या अळीचा, भात पिकावर पिवळया खोड किडीचा तर ऊस पिकावर हुमणी व लष्करी अळीचा प्रादुर्भाव दिसून येत आहे.

**कोल्हापूर विभाग-**

**हवामान-** अहवाल कालावधीत विभागात आकाश ढगाळ होते. विभागात हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या तर तुरळक ठिकाणी जोरदार स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली आहे.

विभागात दि.०६ सप्टेंबर, २०१९ अखेर पर्जन्यमान सरासरीच्या तुलनेत एकूण ३३ तालूक्यांपैकी ३ तालूक्यात ७५ ते १००% तर ३० तालूक्यात १०० % पेक्षा जास्त पाऊस झाला आहे.

**खरीप हंगाम २०१९ -** विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र ८.१६ लाख हेक्टर असून दि.०६ सप्टेंबर, २०१९ अखेर ७.६० लाख हेक्टर क्षेत्रावर (९३ %) पेरणी झाली आहे. विभागात भात पिक फुटवे ते पोटरीच्या अवस्थेत आहे. मका पिक वाढ ते फुलोरा अवस्थेत आहे. बाजरी पिक फुटवे ते पोटरीच्या अवस्थेत आहे तर लवकर पेर झालेल्या काही ठिकाणी पिक दाणे भरणेच्या अवस्थेत आहे. भुईमूग पिक फुलोरा ते आऱ्या सुटण्याच्या अवस्थेत तर मूग व उडिद पिके शेंगा धरणे ते शेंगा भरणेच्या अवस्थेत आहेत. सोयाबीन पिक शेंगा धरणे तर काही ठिकाणी शेंगा भरणेच्या अवस्थेत आहे. पिकांमध्ये आंतर मशागतीची कामे सुरु आहेत. पूरस्थिती/अतिवृष्टीमुळे खरीप तसेच बहुवार्षिक पिके बाधित झाली आहेत.

**किड व रोग-** विभागात मका पिकावर काही ठिकाणी लष्करी अळीचा, भुईमूग पिकावर काही ठिकाणी पाने खाणाऱ्या अळीचा, मुग व उडीद पिकावर मावा किडीचा प्रादुर्भाव दिसून येत आहे.

**औरंगाबाद विभाग-**

**हवामान-** अहवाल कालावधीत विभागात आकाश ढगाळ होते. विभागात हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली आहे.

विभागात दि.०६ सप्टेंबर, २०१९ अखेर पर्जन्यमान सरासरीच्या तूलनेत एकूण २८ तालूक्यांपैकी ११ तालूक्यात ५० ते ७५ %, १२ तालूक्यात ७५ ते १००% तर ५ तालूक्यात १०० % पेक्षा जास्त पाऊस झाला आहे.

**खरीप हंगाम २०१९** - विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र २०.१५ लाख हेक्टर असून दि.०६ सप्टेंबर, २०१९ अखेर २०.२८ लाख हेक्टर क्षेत्रावर (१०१%) पेरणी झाली आहे. विभागात मका पिक फुलोरा ते कणसे लागणेच्या अवस्थेत आहे. कापूस पिक वाढ, पाते फुले लागणेच्या अवस्थेत, मूग,उडिद पिके शेंगा लागणे ते शेंगा पक्वतेच्या अवस्थेत आहेत. बाजरी पिक फुटवे फुटणे ते पोटरिच्या अवस्थेत तर तूर व ज्वारी पिके वाढीच्या अवस्थेत; सोयाबीन पिक फुलोरा ते शेंगा धरणेच्या अवस्थेत असून पेरणी झालेल्या पिकांमध्ये आंतर मशागतीची कामे सुरु आहेत. बीड जिल्हयामध्ये काही ठिकाणी हलक्या जमीनीवरील व कमी पर्जन्य असलेल्या भागातील पिकांच्या वाढीवर परिणाम होत आहे.

**किड व रोग-** विभागात मका पिकावर काही ठिकाणी अमेरिकन लष्करी अळीचा, कापूस पिकावर काही ठिकाणी गुलाबी बोंड अळी व रस शोषणाऱ्या कीडींचा तर सोयाबीन पिकावर गर्डल बीटल, उंट अळी, खोडमाशीचा प्रादुर्भाव दिसून येत आहे.

**लातूर विभाग-**

**हवामान-** अहवाल कालावधीत विभागात आकाश ढगाळ होते. विभागात हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या तर तुरळक ठिकाणी जोरदार पावसाची नोंद झाली आहे.

विभागात दि.०६ सप्टेंबर, २०१९ अखेर पर्जन्यमान सरासरीच्या तूलनेत एकूण ४८ तालूक्यांपैकी १ तालूक्यांत २५ ते ५० %, १९ तालूक्यात ५० ते ७५ %, २४ तालूक्यात ७५ ते १००% तर ४ तालूक्यात १०० % पेक्षा जास्त पाऊस झाला आहे.

**खरीप हंगाम २०१९** - विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र २७.८७ लाख हेक्टर असून दि.०६ सप्टेंबर, २०१९ अखेर २६.५६ लाख हेक्टर क्षेत्रावर (९५%) पेरणी झाली आहे. विभागात मूग व उडिद पिके फुलोरा, शेंगा लागणे तर काही ठिकाणी शेंगा पक्वतेच्या अवस्थेत तर सोयाबीन पिक फुलोरा ते शेंगा धरणेच्या अवस्थेत आहे. बाजरी पिक फुटवे फुटण्याच्या अवस्थेत तर तूर, मका व ज्वारी पिके वाढीच्या अवस्थेत आहेत. कापूस पिक वाढीच्या अवस्थेत आहे. विभागात पिक परिस्थिती समाधानकारक आहे.

**किड व रोग-** विभागात मका व ज्वारी पिकावर काही ठिकाणी अमेरिकन लष्करी अळीचा, कापूस पिकावर काही ठिकाणी गुलाबी बोंड अळी व रस शोषणाऱ्या कीडींचा, सोयाबीन पिकावर अमेरिकन बोंड अळी, पाने खाणारी अळी, उंट अळी, गर्डल बीटल व खोडमाशीचा प्रादुर्भाव दिसून येत आहे.

**अमरावती विभाग-**

**हवामान-** अहवाल कालावधीत विभागात आकाश ढगाळ होते. विभागात हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली आहे.

विभागात दि.०६ सप्टेंबर, २०१९ अखेर पर्जन्यमान सरासरीच्या तूलनेत एकूण ५६ तालूक्यांपैकी ११ तालूक्यात ५० ते ७५ %, ३३ तालूक्यात ७५ ते १०० % तर १२ तालूक्यात १०० % पेक्षा जास्त पाऊस झाला आहे.

**खरीप हंगाम २०१९** - विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र ३२.३१ लाख हेक्टर असून दि.०६ सप्टेंबर, २०१९ अखेर ३१.०० लाख हेक्टर क्षेत्रावर (९६%) पेरणी झाली आहे. विभागात मूग पिक शेंगा लागणे ते शेंगा पक्वतेच्या अवस्थेत, मूग व उडिद पिक फुलोरा ते शेंगा लागण्याच्या अवस्थेत, सोयाबीन फुलोरा ते शेंगा धरणेच्या अवस्थेत आहे. कापूस व तूर पिके वाढीच्या अवस्थेत असून पिकांमध्ये आंतरमशागतीची कामे सुरु आहेत. काही ठिकाणी पर्जन्यमान अवकाशामुळे मूग व उडिद पिकांचे वाढीवर परिणाम होऊन उत्पादनात घट संभवते.

**किड व रोग-** विभागात काही ठिकाणी मका व ज्वारी पिकावर लष्करी अळीचा, कापूस पिकावर गुलाबी बोंड अळीचा व रस शोषणाऱ्या किडींचा तर सोयाबीन पिकावर पाने खाणारी अळी, अमेरिकन बोंड अळी, उंट अळी, गर्डल बीटल व खोडमाशीचा प्रादुर्भाव दिसून येत आहे.

**नागपूर विभाग-**

**हवामान-** अहवाल कालावधीत विभागात आकाश ढगाळ होते. विभागात हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या तर काही ठिकाणी जोरदार ते अतिजोरदार स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली आहे.

विभागात दि.०६ सप्टेंबर, २०१९ अखेर पर्जन्यमान सरासरीच्या तूलनेत एकूण ६४ तालूक्यांपैकी ४ तालूक्यात ५० ते ७५ %, ३० तालूक्यात ७५ ते १०० % पाऊस तर ३० तालूक्यात १०० % पेक्षा जास्त पाऊस झाला आहे.

**खरीप हंगाम २०१९** - विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र १९.१८ लाख हेक्टर असून दि.०६ सप्टेंबर, २०१९ अखेर १८.४६ लाख हेक्टर क्षेत्रावर (९६%) पेरणी झाली आहे. विभागात भात पिक फुटवे फुटणेच्या अवस्थेत आहे. तूर व ज्वारी पिके वाढीच्या अवस्थेत आहेत. कापूस पिक वाढ ते पाते, फुले लागणेच्या अवस्थेत, सोयाबीन पिक वाढ ते फुलोरा अवस्थेत आहेत. गडचिरोली जिल्हयामध्ये काही ठिकाणी क्षेत्र् पाण्याखाली गेल्याने पिकाचे नुकसान झाले आहे.

**किड व रोग-** विभागात काही ठिकाणी मका पिकावर लष्करी अळीचा, कापूस पिकावर गुलाबी बोंडळीचा व रस शोषणाऱ्या किडीचा, सोयाबीन पिकावर काही ठिकाणी चक्री भुंगा, उंट अळी, गर्डल बीटल व खोडमाशीचा तर भात पिकावर काही ठिकाणी पिवळी खोडकिड, लष्करी अळीचा प्रादुर्भाव दिसून येत आहे.

## महाराष्ट्र राज्यातील खरीप हंगामातील मुख्य पिकाखालील दि. ०६/०९/२०१ पर्यंत पेरणी अहवाल

क्षेत्र- हेक्टरमध्ये

| अ.क्र. | पिके | सरासरी क्षेत्र (सन २०१२-१३ ते २०१६-१७) | मागिल वर्षाची पेरणी (दि. ०७/०९/२०१८) | प्रत्यक्ष पेरलेले क्षेत्र | प्रत्यक्ष पेरलेल्या क्षेत्राची सरासरी क्षेत्राशी टक्केवारी | प्रत्यक्ष पेरलेल्या क्षेत्राची मागिल वर्षाच्या क्षेत्राशी टक्केवारी | +/- प्रत्यक्ष पेरणी क्षेत्राची मागिल वर्षाशी तुलना |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | भात | १५०८२२१ | १५०३९३९ | १४५७१५० | ९७ | ९७ | -३ |
| २ | खरीप ज्वारी | ७१९३७७ | ३१३६८६ | २७९३४२ | ३९ | ८९ | -११ |
| ३ | बाजरी | ८१०४६७ | ५२५७३८ | ६५२७७८ | ८१ | १२४ | २४ |
| ४ | रागी | १०९००१ | ८१३९९ | ७८१३४ | ७२ | ९६ | -४ |
| ५ | मका | ७३६६६३ | ८२९००७ | ८६०७४५ | ११७ | १०४ | ४ |
| ६ | इतर तृणधान्य | ५२३४९ | ४३४०६ | ३४७३२ | ६६ | ८० | -२० |
| **खरीप तृणधान्य** | | **३९३६०७८** | **३२९७१७५** | **३३६२८८१** | **८५** | **१०२** | **२** |
| ७ | तूर | १२४७४८७ | १२३३८९५ | १२०६३२९ | ९७ | ९८ | -२ |
| ८ | मुग | ३९७४२४ | ४०२५९८ | ३२४०४७ | ८२ | ८० | -२० |
| ९ | उडिद | ३१८८७३ | ३७५३३१ | २८७६८० | ९० | ७७ | -२३ |
| १० | इतर कडधान्य | ९०३६५ | ७६९०६ | ८६०५७ | ९५ | ११२ | १२ |
| **एकूण कडधान्य** | | **२०५४१४९** | **२०८८७२९** | **१९०४११४** | **९३** | **९१** | **-९** |
| **एकूण अन्नधान्य** | | **५९९०२२७** | **५३८५९०४** | **५२६६९९५** | **८८** | **९८** | **-२** |
| ११ | भुईमुग | २३७०५६ | १९४७३३ | १८६४६२ | ७९ | ९६ | -४ |
| १२ | तीळ | ३०६७० | १३८२१ | १०७५१ | ३५ | ७८ | -२२ |
| १३ | कारळ | २४६९८ | १३१२६ | ७३५९ | ३० | ५६ | -४४ |
| १४ | सुर्यफुल | २७९६३ | ९५२५ | १२७३७ | ४६ | १३४ | ३४ |
| १५ | सोयाबीन | ३५५३३३४ | ३९८६६२४ | ३९५४९७५ | १११ | ९९ | -१ |
| १६ | इतर गळीतधान्य | १३५५६ | ९८२६ | ६३३८ | ४७ | ६५ | -३५ |
| **एकूण तेलबिया** | | **३८८७२७७** | **४२२७६५५** | **४१७८६२२** | **१०७** | **९९** | **-१** |
| **१७** | **कापूस** | **४१९११४४** | **४११८६१४** | **४३८१९०४** | **१०५** | **१०६** | **६** |
| **एकूण पेरणी क्षेत्र** | | **१४०६८६४८** | **१३७३२१७३** | **१३८२७५२०** | **९८** | **१०१** | **१** |
| **१८** | **उस (लागवडीचा)** | **९०४९७७** | **१८०३४४** | **११५२८५** | **१३** | **६४** | **-३६** |
| **एकूण पेरणी क्षेत्र (ऊसासह)** | | **१४९७३६२५** | **१३९१२५१७** | **१३९४२८०५** | **९३** | **१००** | **०** |